SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

# विद्यार्थी विकास विभाग

Dr. S. G. Ghane
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/467 दि. 6 JUL 2026

प्रति

**मा. प्राचार्य/प्रमुख**
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षणसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :– सन २०२६–२०२७ युवा महोत्सवासाठी संयोजन प्रस्तावाबाबत.**

महोदय/महोदया,

आपणास विदितच आहे की, यापूर्वी आपल्या विद्यापीठात एकूण ४५ युवा महोत्सव अत्यंत यशस्वीरित्या संपन्न झाले आहेत. सन २०२६–२०२७ या वर्षीचा ४६ वा युवा महोत्सव साधारणतः खालील कालावधीत आयोजित केला जाणार आहे.

**१. जिल्हा स्तरीय युवा महोत्सव – माहे सप्टेंबर तिसऱ्या किंवा चौथ्या आठवडयात**
**२. मध्यवर्ती युवा महोत्सव – माहे आक्टोबर पहिल्या आठवडयात**

सदरील युवा महोत्सवात नाट्य, संगीत, नृत्य, वाङमय, कला इत्यादी विविध सांघिक व वैयक्तिक स्पर्धा आयोजित केल्या जातील. या स्पर्धातील काही स्पर्धा जिल्हा पातळीवर आयोजित करुन त्यातील निवडक स्पर्धकांना मध्यवर्ती युवा महोत्सवात संधी दिली जाते.

जिल्हा पातळीवरील युवा महोत्सवात एकांकिका, लोकनृत्य, समुहगीत, मूकनाटय, प्रहसिका आणि वादविवाद इत्यादी सामूहिक कला प्रकाराच्या तसेच वक्तृत्व (मराठी, हिंदी, इंग्रजी), सुगम गायन, एकपात्री व एकल लोकवाद्यवादन इत्यादी वैयक्तिक स्पर्धा होतात. तरी आपल्या महाविद्यालयात/संस्थेत वरील स्पर्धासाठी आवश्यक ती सुविधा उपलब्ध असेल तर आपण जिल्हा अथवा मध्यवर्ती युवा महोत्सव आयोजनासाठी आपला प्रस्ताव सोबतच्या तक्त्यात आवश्यक ती माहिती भरुन दिनांक **२४ जुलै, २०२६** पर्यंत या कार्यालयास पोहोचेल अशाप्रकारे पाठवावा. ही विनंती.

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत:–
१. युवा महोत्सव आयोजनासाठी यजमान महाविद्यालयाने भरुन दयावयाच्या माहिती तक्ता.